# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०२०.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com)**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल , प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होईल; तर काही मंडळींना मोठ्या मान्यवरांच्या ओळखी झाल्यास त्यापासून प्रगतिकारक व लाभदायक घटना घडतील. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात अधिक प्रमाणात अनुकुल काळ आहे. महिन्याच्या उत्तरार्धात स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. काही भाग्यवान मंडळींना एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही संभवते. काही मंडळींना बढती, पगारवाढ, अन्य मार्गाने अर्थलाभ होणेही संभवते. काहींना नवे मित्र मिळतील व सुखसमाधान लाभेल. पण नेपच्यूनमुळे काहींच्या अर्थप्राप्तीत घोटाळे होणे, कुमार्गी मित्रांपासून नुकसान होणेही शक्य आहे. तसे घडले तर नैराश्य येईल. जपा. शुक्रामुळे मधून मधून क्षणिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, कोणाचा धाक, दडपण सहन न होणारा असा घडणे संभवते.

या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड व खोडकर होण्याची शक्यता आहे. जपा. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतुमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींचे आचरण ढोंगी, धूर्त होणेही संभवते. पण येथील गुरु ग्रहामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग् येतील. मात्र शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप होणे संभवते. सद्गुणांची वाढ होईल. तर काहींचा उत्कर्ष होईल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर २१ वेळा “ ओम गं गणपतये नम: “ मंत्राचा जप करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकल असल्याचाच अनुभव येईल. राहूमुळे कुटुंबात कलह व आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे सुद्धा सांपत्तिक अडचणी त्रस्त करतील. काही मंडळींना कठीण अशा जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता सुद्धा आहे. काही मंडळींना बेअब्रू होण्यापासून जपावे लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ, गुरु, केतूपैकी मंगळामुळे उष्णता विकाराचे आजार होणे संभवते. विशेष करून मूळव्याधीसारखे आजार झाल्यास असह्य त्रास सहन करावा लागेल. तसेच अपघातापासून जपा. हाडमोड होणे संभवते. तसेच पाण्यापासून व विजेपासून धोका संभवतो. म्हणून जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा. केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काहींना त्वचारोगाचा, मुखदंत रोगाचा किंवा रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. अशा परिस्थितीत ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना गुरु ग्रहामुळे अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ मिळू शकेल. भाग्य स्थानी असलेला रवि ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे मानसिक ताण, आजार, नोकरीत मानहानी, घरी वडील

मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शनीमुळे काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. प्रगती, यश, धनलाभ होणेही शक्य आहे. दशम स्थानी आधीपासूनच असलेल्या बुध नेपच्यून ग्रहांमुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. येथील नेपच्यून द्रव पदार्थ व्यापार असणारांना व मनोवैज्ञानिकांना अनुकुल व लाभदायक होईल. लाभस्थानी उच्च राशीत असलेल्या शुक्रामुळे सर्व काही सुखाचे असेच घडेल. श्रद्धा असेल तर श्रद्धेने शिवोपासना केल्यास ती अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज या राशीच्या पुरुषानी स्नान करून "ओम नम: शिवाय " मंत्राचा तर स्त्रियांनी "ओम शिवाय नमः: " मंत्राचा १०८ वेळा जप करावा आणि "शिवलीलामृत" स्तोत्राचे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या राहूमुळे अकारण अपमान होणे संभवते. त्यामुळे संतापून काहीजण सूडभावनेने पछाडले जातील. पण त्यांनी मनावर ताबा ठेवावा व सहनशील व्हावे. न पेक्षा वातविकाराचा जोर होईल व व एखादा वातविकार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी मंगळ , गुरु, केतू आहेत. गुरु ग्रहामुळे नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध वाढतील, काहींना विवाहयोग तर काहींना प्रवासाचे योग येतील. येईल, तसेच अर्थलाभ होण्याचीही शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांना पुत्रप्राप्ती होणेही संभवते. पण मंगळ - केतू प्रतिकुल असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज आदि कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. केतुमुळे मनस्थिती अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. या राशीच्या अष्टम-नवम स्थानी असलेल्या रवि ग्रहामुळे अनारोग्य होणे संभवते.

त्यामुळे प्रतिकारशक्ती कमी होण्याची शक्यता आहे. तसेच विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. हाती घेतलेल्या कामात अपयश येण्याची शक्यता आहे. तसे घडले तर मन भरकटत जाईल व हातून नको ते घडेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि ग्रह भाग्यस्थानी गेला तरी प्रतिकुलच होईल व त्यामुळे नोकरीत मानहानी होणे, मानसिक ताण निर्माण होणे, त्यामुळे एखादा आजार बळावणे संभवते. शिवाय वडीलधाऱ्या मंडळींचा विरोधही सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला शनि ग्रहही मनस्ताप व अनारोग्य देण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मन शांत ठेवा, संयमाने आचरण करा, सहनशीलपणा वाढवा. विपरीत काळ गेला की सर्व सुखाचेच होईल. भाग्यस्थानी असलेला नेपच्यून शुभ असून ज्यांना आध्यात्मात रस आहे अशांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील तर काही मंडळींना

परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी असलेला उच्च राशीतील शुक्र नोकरी-व्यवसायास प्रतिकुल असला तरी कलाक्षेत्रातील मंडळींना अनुकुल होण्याची शक्यता आहे. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. पण काहींना अनपेक्षितपणे अर्थलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर उपासनेस काळ अनुकुल असल्यामुळे इष्ट दैवताची उपासना करा. दररोज स्नान करताना १०८ वेळा जप करा.

**(४) कर्क -** या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ ग्रह अनारोग्यकारक असून त्यामुळे ताप येणे, रक्तविकार, हृदयविकार बळावणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक हानी होणे, इजा होणे,

अंगावर फोड येणे, चोरी होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता असते. जपा. पण याच स्थानी असलेले गुरु-केतू हे दोन्ही ग्रह अनुकुल असल्यामुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही, असे वाटते. शिवाय हा गुरु नोकरी-व्यवसायास पूरक होणेही शक्य आहे. तसेच येथील केतूमुळे आरोग्य सुधारेल व सर्व अनुकुल असेच घडेल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेला रवि ग्रह केंद्रस्थानी असल्याने अनुकुल होईल; पण त्यामुळे अनारोग्य होऊन पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. शिवाय तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर. अधिक प्रतिकुल होईल व त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. येथील शनि ग्रहामुळे विवाहेच्छूना विवाहयोग उशीरा येण्याची शक्यता आहे. राशीच्या अष्टम स्थानी असलेला बुध ग्रह अनुकुल व सुखकारक होईल; पण तेथेच असलेला नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहू नका. तसेच उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला उच्च राशीतील शुक्र ग्रह अनुकुल असून त्यामुळे गुरुकृपा, सुसंगती, थोरकृपा, सुखसमाधान व काही भाग्यवंतांना कीर्ती-प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल ग्रह नोकरी-व्यवसायास अनुकुल असून विशेष करून शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे अर्थलाभ होईल, तर काही मंडळींना परदेशगमनाचा योग येईल, हितशत्रूंपासून रक्षण होईल; पण तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यात आहे. जपा. श्रद्धा असेल तर आपल्या कुलदैवतची उपासना तसेच गुरु ग्रहाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(५) सिंह -** या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी या महिन्याचा काळ अनुकुल आहे. तसेच आध्यात्मिक उपासनेची आवड असणारांना व विशेष करून वैद्यकीय शिक्षण घेत असणारांनाही काळ अनुकुल होईल. पण काहींच्या शिक्षणात अनारोग्य व कौटुंबिक परिस्थितीनुसार अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. विशेष करून पोटाचे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या कौटुंबिक जबाबदारी असणाऱ्याच्या संततिसुखात बाधा येणे संभवते. मुलांना परीक्षेवेळी आजार होणे, विक्षिप्त आचरण होणे अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या षष्ठ स्थानी असलेले रवि -शनि नोकरी-व्यवसायास पूरक असले तरी शनीमुळे गैरसमजुती, भांडणे, शत्रुत्व, अनारोग्याचा त्रास होणे संभवते. क्वचित कोणास हृदयविकाराचा आजार होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले बुध -नेपच्यून प्रतिकुल असून त्यांच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला उच्च राशीतील शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा धनलाभ होणे संभवते. तसेच काहींना वारसा हक्काने असा धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना अगदी कमी श्रमात धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला हर्षल ग्रह शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असून हे कार्यक्षेत्र असणारांना संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. तसेच या हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी असलेला राहू संततिविषयक चिंता निर्माण करण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या ज्या मंडळींच्या हाती सत्ता, अधिकार आहे त्यांनी त्याचा गैरउपयोग करण्याचा मोह करू नये. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. श्रद्धा असेल तर आपल्या कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींना कौटुंबिक सुखाचे दृष्टीने गुरु ग्रह अनुकुल असला तरी त्याच स्थानी असलेले मंगळ -केतू प्रतिकुल आहेत. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच नातलगांपैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यताही दिसते. कुटुंबात असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. कोणाशी पटणार नाही. स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार करणार असाल तर जपून करा. केतूमुळे विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या पंचम स्थानी असलेला रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे नोकरीत वरिष्ठांचा त्रास, नातेवाईक मंडळींपासून दूरत्व येणे, अनारोग्य होणे, अपघात होणे, मुलांपैकी कोणाच्या आजाराची चिंता निर्माण होणे अशापैकी घटना घडणे संभवते. तेथेच असलेल्या शनि ग्रहामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह नोकरी-व्यवसायास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. याच षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काल्पनिक चिंता त्रस्त करतील. फसवणुकीचा त्रास होणेही संभवते. जपा. पण बुध ग्रह अनुकुल असल्याने दिलासा मिळेल. या राशीच्या सप्तम स्थानी उच्च राशीतील शुक्र असल्याने विवाहेच्छूपैकी काहींचे प्रेमविवाह संपन्न होतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलपासून अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगातच चालवा. मोबाईलवर वार्तालाप करू नका. घरीदारी वावरताना सावधानतेने आचरण करा. या राशीच्या दशम स्थानी असलेला राहू अनुकुल असून या राशीच्या नोकरदार मंडळींना बढती, अधिकार, सत्ता, सन्मान, यश असे सर्व काही मिळू शकेल. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे स्नान झाल्यावर " ओम गं गणपतये नमः " मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच " गणपति अथर्वशीर्षा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या लेखक मंडळींना ग्रन्थलेखनास या महिन्याचा काळ अनुकुल आहे. त्यासाठी प्रवास करण्याचा योगही संभवतो. पण एकच प्रतिकुल गोष्ट अशी की एखाद्या भावंडाकडून अकारण मनस्ताप दिला जाणे संभवते. गुरु-मंगळ शुभ योग असल्यामुळे धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. कर्तबगारी दिसून वाढेल. पण हे सर्व सतत सावधानतेने करा. इजा, दुखापत होणे संभवते. केतू मुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक धनलाभ होईल. अशाही परिस्थितीत ज्यांना काही मानसिक दु:ख असेल त्यांनी शिवोपासना करावी. या राशीच्या स्त्री-पुरुषानी स्नान झाल्यावर जप करावा. पुरुषानी "ओम नमः शिवाय " मंत्राचा तर स्त्रियांनी मन:शांतीसाठी "ओम शिवाय नम : " मंत्राचा एक माळ (१०८) जप करावा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले रवि -शनि दोन्ही ग्रह प्रतिकुल असून त्यांच्यामुळे कौटुंबिक सुखात गैरसमज, भांडणतंटे, अन्य कटकटी, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना असह्य मनस्ताप सहन करावा लागून गहिरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस व भावनाशील मन आहे त्यांना पंचम स्थानी असलेला नेपच्यून अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. तसेच गूढविद्येत संशोधनासही हा नेपच्यून अनुकुल होईल. पण बुध बौद्धिक राशीचा असूनही संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी उच्च राशीत शुक्र ग्रह असला तरी ज्यांनी आपल्या आवडत्या कलाक्षेत्रात उच्च गुणवत्ता प्राप्त केली आहे त्यांनाही आपल्या कलेतील कर्तबगारी

सिद्ध करण्यास संधीच मिळणार नाही. या शुक्राजवळ शुद्ध प्रेमभावना नसते. शिवाय नैराश्यामुळे ही मंडळी व्यसनाधीन होण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी हर्षल ग्रह असल्यामुळे जीवनसाथी वा जीवनसंगिनीचे आचरण लहरी, विक्षिप्त झाल्यामुळे पतिपत्नीत भांडणे, वाद होतील. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशय, गैरसमज आदी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी राहू असून त्यामुळे काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर मन:शांतीसाठी लक्ष्मीपति भगवान नारायणाची उपासना करा. दररोज स्नान करताना “ओम वैष्णवे नमः “ मंत्राचा १०८ वेळा जप करा. शक्य असल्यास “विष्णु सहश्रनामाचे “ पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींचा शनि ग्रहाच्या साडेसातीचा त्रास संपला असला तरी या महिन्याच्या काळात या राशीच्या धनस्थानी मंगळ -केतू असल्यामुळे विविध प्रकारे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट-परिश्रम करावे लागतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान दाढा आदींचे अनारोग्य होणे संभवते. अशा परिस्थितीत या स्थानी असलेला गुरु ग्रह आर्थिक चिंता कमी करू शकेल व कुटुंबस्थानी असल्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान देऊ शकेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेले रवि-शनि अनुकुल असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. नोकरदार मंडळी आपल्या कार्यकौशल्याने वरिष्ठांना प्रभावित करतील. त्यामुळे काही मंडळींना एखादे मानाचे स्थान तर क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पण शनीमुळे एखादी भावंडविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले बुध -नेपच्यून गृहसौख्य, मित्रसुख देणारे असले तरी नेपच्यूनमुळे गैरसमज, आर्थिक घोटाळे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी असलेला उच्च राशीतील शुक्र सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळींना अनुकुल होईल व त्यांना आपल्या कलेचा आनंद लुटता येईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यातील प्रगतीस पूरक होईल. पण तो मनाने चंचल व अनारोग्यकारक असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींना मुदतीचा ताप, काहींना डोकेदुखीचा तर क्वचित कोणास अति विचारामुळे मेंदूविकार जडणेही संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे जन्मकुंडलीत योग असेल तर अचानक धानलाभ होऊ शकेल. पण तो विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व
मन:शांती लाभेल. दररोज स्नान करतांना २१ वेळा “ओम गं गणपतये नमः:” मंत्राचा जप करा. नंतर “श्रीगणेश अथर्वशीर्षा” चे पठण करा. तसेच रात्री “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी स्वराशीचा गुरु; मंगळ व केतू असे तीन ग्रह आहेत. स्वभाव हट्टी, मानापमान फार असा असणारांना येथील मंगळामुळे खूप श्रम, दगदग करावी लागण्याची शक्यता दिसते, नोकरदार मंडळींना तर तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. केतूमुळे वाहनधोका संभवतो. जपा. केवळ गुरु ग्रहामुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही व तो केवळ बौद्धिक व संशोधनात्मक व लेखन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल व यशदायी होण्याची शक्यता आहे. या

राशीच्या धनस्थानी असलेले रवि -शनि ग्रह आर्थिक चिंता निर्माण करतील व त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे थकवा येऊन अनारोग्य होणेही संभवते. शनि ग्रहामुळे कुटुंबातील प्रियजनांपैकी कोणाचे दूरत्व झाल्यास अस्वस्थता वाटेल. त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. रक्तविकार, हृदयविकार असणारानी विशेष काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व सर्व काही मनासारखे घडेल. पण त्याच स्थानी रवीसह बुध व नेपच्यूनही असल्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होणे संभवते. शिवाय बुधामुळे हितशत्रूचा त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे काही विवाहेच्छू मंडळींना विवाहयोग संभवतो. शिवाय ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला हर्षल ग्रह गुरु ग्रहाशी शुभ योग करत असल्याने बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होऊ शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे काही मंडळींच्या मनात कपटी विचार येणे, वाममार्ग धन प्राप्त करण्याची तीव्र इच्छा निर्माण होणे संभवते. जपा. तसेच हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे”चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी महिन्याच्या पूर्वार्धात रवि -शनि ग्रह असून ते दोघेही अनारोग्यकारक, मनस्तापदायक, नियोजित कार्यात अडथळे निर्माण करणारे व कसली ना कसली चिंता निर्माण करणारे आहेत. काही मंडळींना थकावट जाणवेल. त्यामुळे मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. काही मंडळींच्या कौटुंबिक जीवनात प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास गहिरे नैराश्य येणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असणारे रवि -बुध --नेपच्यून हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असणार असल्यामुळे वित्तहानी, वाढत्या खर्चाची आर्थिक चिंता, दु:ख, अनिष्ट घटना अशापैकी कारणांनी अस्वस्थता येईल. काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा असून प्रतिकुल असल्यामुळे सतत सावधानतेने व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला शुक्र ग्रह अनुकल असल्यामुळे अशा प्रतिकुल काळातही या राशीच्या काही मंडळींना धनलाभ, काहींना भूमि लाभ ,तर काही मंडळींना मान, प्रतिष्ठा असे काही मिळू शकेल. पण चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव सतत तक्रारखोर राहील, कोणाशी पटणार नाही व कशातच सुखसमाधान लाभणार नाही. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे हितशत्रूंवर विजय मिळेल, ज्यांचा इतर जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे लाभ होईल. पण या राहूमुळे या राशीच्या काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. तसेच तो विषभयकारी असल्यामुळे शक्यतो बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या व्ययस्थानी असलेले गुरु-मंगळ -केतु हे तिन्ही ग्रह प्रतिकुल असून केतूमुळे स्वभाव लहरी होईल. मंगळ ग्रह खूपच प्रतिकुल होईल व त्यामुळे कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता, मानहानी, भांडणे अशापैकी कारणांनी अस्वस्थ वाटेल. पण येथील गुरु अध्यात्म, समाजकार्य यांची मनापासूनच आवड असणारांना अनुकुल होईल व त्यामुळे नियोजित कार्यात अपेक्षापूर्तीचे समाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना करा. दररोज रात्री नियमितपणे “हनुमानचालिसा “ स्तोत्राचे पठण करा. त्यामुळे मन:शांती लाभेल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ " कधी हसू तर कधी रडू " अशा संमिश्र अनुभवाचे जाण्याची शक्यता दिसते. रवि -शनि -बुध हे तीन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार असून राहू व नेपच्यूनमुळे काही प्रमाणात अस्वस्थता निर्माण होईल. अडचणी त्रस्त करतील व त्यामुळे अस्वस्थता जाणवेल. बुधामुळे धननाश, कुसंगती, मित्रद्रोह यांचा मनस्ताप सहन करावा लागेल. रवीमुळे पराभूतीचे दु:ख, आर्थिक चिंता, अनारोग्य, असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. शनीमुळे तर संकटपरंपरेशीच मुकाबला करावा लागेल. अशा या प्रतिकुल काळात सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार सावधानतेने, विचारपूर्वक व फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करा. नपेक्षा अकारण मानहानी व असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. नेपच्यूनमुळे सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. मानसिक संवेदनाही चटकन मनावर परिणाम करत असतील. त्यामुळे गहिरे नैराश्य त्यात असावे, असे वाटते. पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. पण या राशीच्या ज्या मंडळींचा कमिशन, दलालीचा व्यवसाय आहे त्यांना मात्र हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. पण गुरु-शुक्र- व काही प्रमाणात मंगळ अनुकुल असल्याने मनोनुकूल घटना घडतील व दिलासा मिळेल. गुरूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल, मित्रसुख मिळेल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. विवाहेच्छूचे विवाह होतील. काही मंडळींना वाहनसुख तर काहींना काहींना आर्थिक लाभ होणे संभवते. या राशीच्या धनस्थानी उच्च राशीत असलेल्या शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुख, कौटुंबिक प्रगती व सुख, तसेच आर्थिक लाभ होणेही संभवते. केतूमुळे प्रवासाचे योग संभवतात. मंगळ ग्रह कष्टदायक व मैत्रीत वितुष्ट आणणारा असला तरी काही भाग्यवान मंडळींना त्याच्यामुळे एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व दिलासा मिळेल. दररोज रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा” स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या राशीच्या नोकदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. कारण ,महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल होण्याची दाट शक्यता दिसते. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील व नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. शनि ग्रह अनुकुल असला तरी त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा व्यय स्थानी असलेला बुध ग्रहही प्रतिकुल असून त्याच्यामुळे मानहानी, अनारोग्य, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. केतूमुळे स्वभाव लहरी होईल व त्याला विक्षिप्त स्वभावाच्या हर्षलची साथ मिळून या राशीच्या मंडळींचा स्वभाव अधिकच लहरी, चंचल, अस्थिर विचाराचा घडणे संभवते. तसे झाले तर समोरच्या व्यक्तीचा फटकळ बोलण्याने अपमान होत आहे हेही त्याला समजणार नाही. जपा. तसेच विचित्र व विक्षिप्त असे आचरण होणेही संभवते. त्यातून अविचाराने खर्च होईल. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या उच्च राशीतील शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू प्रतिकुल असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात वाद, भांडणे, अनिष्ट घटना अशापैकी कारणांनी बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे ज्यांचा स्वतंत्र व्यवसाय आहे अशापैकी काहींच्या स्वतंत्र व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता

दिसते. काही मंडळींना हातचा नोकरीव्यवसाय सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तसा विचारही करू नये. नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. त्यामुळे काहींचा वरिष्ठांशी वाद, भांडण होणेही संभवते. पण याच स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बुद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक होईल. वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वावर खूष होतील. त्यामुळे काही मंडळींना मानसन्मानाचा लाभ होणेही शक्य आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. त्यामुळे मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====